दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २५१ | MAHMAR/2006/17212 | रायगड | मंगळवार, दि.९ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## फेसबुक मैत्रीचा फसवा सापळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

फेसबुकद्वारे एका अनोळखी महिलेसोबत मैत्री करणे तळोजा येथील एका ३७ वर्षीय पर्यावरणविषयक सल्लागाराला चांगलेच महागात पडले. या सल्लागाराने ज्या महिलेसोबत फेसबुकद्वारे मैत्री केली, त्या महिलेने या सल्लागाराला विश्वासात घेऊन त्याला फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवण्यास सांगून त्याच्याकडून तब्बल ५६ लाख २७हजार रुपये उकळल्याचे उघडकीस आले आहे.

सायबर पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात महिलेसह या प्रकरणात सहभागी इतर आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे. ऑगस्ट महिन्यामध्ये आरोही मिश्रा नावाच्या महिलेने फेसबुकवरून फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली. विविध बँक खात्यांवर पैसे पाठवण्यास सांगितले. सुरुवातीला वेबसाईटवर बनावट नफा दाखवून त्याचा विश्वास जिंकला. त्यानंतर एका व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये समावेश करून रमेश शर्माच्या द्वारे ट्रेडिंग सुरू ठेवण्यास सांगितले. विविध खात्यांवर तब्बल ५६ लाख २७ हजार रुपये भरल्यानंतर वेबसाईटवर त्याच्या नावावर १ कोटी १७ लाखांचा नफा दाखवला. या सल्लागाराला संशय आल्यानंतर त्याने सायबर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

### पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका २०२५

# प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचनांवर महापालिकेच्या वतीने युध्दपातळीवर कार्यवाही

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मा.राज्य निवडणूक आयोगाने पूरविलेल्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ प्रारूप मतदार यादीवर आलेल्या हरकती व सूचना यांवर कार्यवाही करण्यासाठी महापालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली युध्दपातळीवर काम करते आहे.या कामासाठी महापालिकेने प्रभाग निहाय नियंत्रण अधिकाऱ्यांची नेमणूक केली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक नियंत्रण अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

हरकती व सूचना यांची प्रत्यक्ष स्थानिक पातळीवर पडताळणी करून सदर हरकतींवर चौकशी अहवालानुसार निर्णय घेतला जात आहे. हे काम लवकरात लवकर पार पाडण्यासाठी महानगरपालिका प्रशासन पूर्ण क्षमतेने कार्यरत असून शनिवार रविवारी या सुट्ट्यांच्या दिवशीही कार्यालये सुरु ठेऊन कामकाज करण्यात आले. प्रारूप मतदार यादीवरती महापालिकेकडे सुमारे २९ हजार ४२३ हरकती प्राप्त झाल्या असून यातील बहुतांश हरकती या दुबार मतदारांबाबत आहेत. सदर दुबार मतदारांबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या २९ ऑक्टोबर २०२५ सूचनांनूसार बीएलओंच्या मार्फत समक्ष चौकशी करून कार्यवाही करण्यात येत आहे. प्रारूप मतदार यादीवरील हरकतींवर केलेल्या कार्यवाहीनुसार अंतिम मतदार याद्या दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येतील अशी माहिती निवडणूक विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी दिली आहे.




> निवडणूक आयोगाने दिलेल्या कालमर्यादेत सर्व हरकती निकाली काढण्याबाबत पनवेल महापालिका प्रशासन दक्षता घेत आहे.
>
> **–मंगेश चितळे, आयुक्त तथा प्रशासक, पनवेल महानगरपालिका**

# तपोवनातील वृक्षतोड रोखण्यासाठी सयाजी शिंदेंनी घेतली राज ठाकरेंची भेट



**दै.रायगड नगरी । मुंबई**


नाशिकमधील सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी उभारण्यात येणाऱ्या साधुग्राममुळे तपोवनातील झाडांवर कुऱ्हाड चालविण्यात येणार आहे. या वृक्षतोडीला सर्वच स्तरांतून विरोध होत असून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही वृक्षतोडी विरोधातीला आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे. या पार्श्वभूमीवर अभिनेते सयाजी शिंदे यांनी राज ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान तपोवनचे जतन, परिसरातील जैवविविधतेचे रक्षण आणि स्थानिकांच्या सहभागातून वृक्षतोडीविरोधातील मोहीम अधिक व्यापक करण्याबाबत चर्चा झाली.

नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमाळ्याची तयारी सुरू आहे. साधुग्रामसाठी तपोवनातील तब्बल १७०० झाडे तोडणे, पुर्नरोपण करणे वा फांद्यांची छाटणी करावी लागणार असल्याची नोटीस महापालिकेने दिली आहे. या वृक्षतोडीविरोधात चित्रपट, नाटक, सामाजिक संस्था, राजकीय पक्षांनी मोहिम उघडली आहे. यासंदर्भात अभिनेते सयाजी शिंदे यांनी राज ठाकरे यांची भेट घेतली असता राज ठाकरे यांनीही या वृक्षतोडीविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण चित्रपट सेनेचे अध्यक्ष अमेय खोपकर उपस्थित होते. बैठकीत तपोवनचे जतन, परिसरातील जैवविविधतेचे रक्षण आणि स्थानिकांच्या सहभागातून मोहीम अधिक व्यापक करण्याबाबत चर्चा झाली. राज ठाकरे यांनी मोहिमेबद्दल सकारात्मक भूमिका दर्शवली असून पर्यावरण रक्षणासाठी आवश्यक ते सहकार्य देण्याची तयारी दर्शवल्याचे मनसे पक्षाकडून स्पष्ट करण्यात आले.

# ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पुणे**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि कष्टकऱ्यांचे नेते डॉ. बाबा आढाव (वय ९५) यांचे सोमवारी रात्री निधन झाले. हमाल, रिक्षाचालक आणि बांधकाम मजुरांचे संघटन करून त्यांच्या न्यायासाठी लढणारे श्रमिक चळवळीचे आधारस्तंभ ही त्यांची ओळख होती. त्यांच्यामागे पत्नी शीला आढाव, असीम आणि अंबर हे दोन मुलगे, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.



फुफ्फुसात बिघाड झाल्याने डॉ. बाबा आढाव यांच्यावर गेल्या दहा दिवसांपासून खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. श्वास घेण्यास त्रास होत असल्याने त्यांना कृत्रिम श्वसन यंत्रणेवर ठेवण्यात आले होते. मात्र, वयोमानामुळे त्यांची प्रकृती उपचारांना पुरेसा प्रतिसाद देत नव्हती. उपचारांदरम्यान सोमवारी रात्री साडेआठच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली.

बाबा आढाव यांचा जन्म १ जून १९३० रोजी पुण्यात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण महापालिका शाळेत तर, शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण झाले. रसायनशास्त्राची पदवी संपादन करून त्यांनी ताराचंद रामनाथ आयुर्वेद महाविद्यालयातून १९५२ मध्ये पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी नाना पेठेतील घरी वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. भाऊसाहेब रानडे, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, आणि राम मनोहर लोहिया यांच्या समाजवादी सिद्धांतांनी बाबा प्रेरित झाले. राष्ट्र सेवा दलात भाई वैद्य, पन्नालाल सुराणा, बापूसाहेब काळदाते यांच्यासह इतर समाजवादी नेत्यांसोबत त्यांनी काम केले.

# नवघर–खोपटा रस्त्यावरील अपघातात भेंडखळ गावातील तरुण ठार

**दै.रायगड नगरी नगरी । उरण**

उरण तालुक्यातील नवघर – खोपटा रस्त्यावरील बामण लाँडी यार्ड जवळ सोमवारी ( दि ८) दुपारी ठिक १–३० च्या सुमारास झालेल्या अपघातात भेंडखळ गावातील अमोल काळूराम ठाकूर (वय ३८ ) हा तरुण जागीच ठार झाला. या अपघाताची नोंद उरण पोलिस ठाण्यात करण्यात आली.यावेळी संतप्त नागरिकांनी रास्तारोको केला.



मिळालेल्या माहितीनुसार भेंडखळ गावातील अमोल काळूराम ठाकूर हा तरुण आपल्या मोटारसायकल वरुन खोपटा गावाकडे सोमवारी दुपारी ठिक १–३० च्या सुमारास जात असताना नवघर – खोपटा रस्त्यावरुन भरधाव वेगाने जाणाऱ्या कंटेनर ट्रेलर ( एम एच ४२ बी यू ५०७२) ने अमोलच्या मोटारसायकला जोरदार धडक दिली व अमोलला काही अंतरावर फडफड नेले.या झालेल्या अपघातात अमोल ठाकूर या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन सदर कंटेनर ट्रेलर ताब्यात घेतला.यावेळी संतप्त नागरिकांनी रास्तारोको केला.

### पुणेच्या 'बरड' एकांकिकेने पटकाविला 'राज्यस्तरीय अटल करंडक'

# 'गौरव रंगभूमीचा' पुरस्काराने नीना कुलकर्णी आणि सुनील बर्वे यांचा सन्मान

### भव्य–दिव्य आणि सिने–नाट्य सोहळ्याला साजेसा नयनरम्य सोहळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या १२ व्या 'राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका' या राज्यातील सर्वात मोठ्या आणि महत्वाच्या स्पर्धेत पुणेच्या रंग पंढरी संस्थेच्या 'बरड' एकांकिकाने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत १२ व्या पर्वातील 'अटल करंडक'वर आपले नाव कोरले. त्यांना मान्यवरांच्या हस्ते एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच या वर्षी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सव वर्ष असल्याने या महत्वपूर्ण वर्षानिमित्त 'गौरव रंगभूमीचा' पुरस्काराने ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी आणि सुनील बर्वे या दोन रंगकर्मीचा गौरव करण्यात आला.



मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील तसेच रंगभूमीवरील एक अत्यंत मान्यवर, अनुभवी अभिनेत्री म्हणून नीना कुलकर्णी ओळखल्या जातात. नाटक, चित्रपट, दूरदर्शन आणि वेब सिरीज या सर्व माध्यमांत त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. तर सुनिल बर्वे हे सुद्धा मराठी रंगभूमी, दूरदर्शन व चित्रपट क्षेत्रातील एक लोकप्रिय कलाकार आहेत. त्यांची साधी–सरळ भूमिका ते विनोदी, गंभीर, भावनिक अशा विविध प्रकारच्या भूमिका सहजतेने साकारतात म्हणून ते प्रेक्षकांमध्ये विशेष प्रिय आहेत. या दोन्ही मान्यवरांना प्रदान करण्यात आलेल्या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ आणि प्रत्येकी ५० हजार रुपये असे होते. पनवेल येथील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेच्या महाअंतिम फेरीचे पारितोषिक वितरण आणि सन्मान सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला.

नाट्यगृहाच्या प्रवेशद्वारापासून रंगमंचापर्यंत संपूर्ण वातावरण एक वेगळीच आणि मनमोहक अनुभूती देणारे होते. प्रवेश करताच भव्य नटराज प्रतिकृतीचे दर्शन मनाला भारावून टाकणारे होते. पुढे एकांकिकांची तपशीलवार माहिती आणि सुबक सजावटीने सजलेली आकर्षक आरास कलाकार, नाट्य रसिक आणि पाहुण्यांचे लक्ष वेधून घेत होती. कलाकार, मान्यवर आणि प्रेक्षकांसाठी लाल कार्पेटची व्यवस्था करून स्वागताचा देखणा सोहळा उभा करण्यात आला होता. या वर्षी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यस्तरीय अटल करंडक बहारदार सोहळ्याने अधिक विशेष ठरला. थोर दानशूर व्यक्तिमत्व लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सामाजिक कार्याला नेहमीच पाठबळ राहिले आहे. त्यामुळे यंदाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा कलाकार आणि प्रेक्षकांच्या वतीने आयोजकांमार्फत विशेष सत्कार करण्यात आला.

हा महाअंतिम फेरीचा पारितोषिक वितरण व सन्मान सोहळा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याला सन्माननीय उपस्थिती म्हणून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, पनवेल महापालिकेचे उपयुक्त गणेश शेट्ये, तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध अभिनेते गिरीश ओक, सुप्रसिद्ध दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, सुप्रसिद्ध अभिनेते सुनील तावडे, दिगदर्शक व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबई प्रमुख कार्यवाह अजित भुरे, सुप्रसिद्ध अभिनेता जयवंत वाडकर, भरत सावले, सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, अटल करंडक आयोजन कमिटीचे उपाध्यक्ष विलास कोठारी, निर्माता संजय पाटील, अटल करंडक ब्रँड अँम्बेसिडर सुप्रसिद्ध अभिनेते सुव्रत जोशी, अभिनेते व दिग्दर्शक प्रमोद शेलार, प्रमोद अत्रे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, माजी शहर अध्यक्ष अनिल भगत, जयंत पगडे, माजी महापौर कविता चौतमोल, युवा मोर्चाचे अध्यक्ष आनंद ढवळे, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, प्रभाकर बहिरा, महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा रुचिता लोंढे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, सुरेखा मोहोकर, राजश्री वावेकर, वृषाली वाघमारे, मोनिका महानवर, वर्षा नाईक, अमित ओझे, प्रीतम म्हात्रे, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष हिमेश बहिरा, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, कार्यवाह श्यामनाथ पुंडे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, स्मिता गांधी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



# उरण-नेरूळ रेल्वे फेऱ्यांत वाढ; केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे आ.महेश बालदी यांनी मानले आभार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उरण-नेरूळ रेल्वे मार्गावरील फेऱ्यांमध्ये वाढ करण्याच्या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल आमदार महेश बालदी यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. उरण परिसरातील नागरिक, दैनंदिन प्रवासी, विद्यार्थी, महिला व व्यावसायिक यांच्या वाढत्या मागणीची दखल घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

आमदार महेश बालदी यांची मागणी व सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने मंजूर केलेल्या वाढीव लोकल फेऱ्या नववर्षाच्या प्रारंभी सुरू होणार आहेत. निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर सकाळी ६.०५ वाजता सुटणारी पहिली गाडी तसेच रात्री उशीरा धावणाऱ्या अतिरिक्त लोकल्स यांचा औपचारिक शुभारंभ केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते होणार आहे.फेऱ्यांच्या वाढीमुळे उरण, जासई, खारकोपर, गव्हाण आणि नेरूळ या परिसरातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. उरण-नेरूळ मार्ग हा उरण उपनगरे, जेएनपीटी क्षेत्र, औद्योगिक पट्टा तसेच नवी मुंबई-मुंबईमध्ये कामधंद्यासाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. वाढीव फेऱ्यांमुळे प्रवासाचा वेळ कमी होऊन सकाळ-संध्याकाळच्या गर्दीचा ताणही कमी होणार आहे. या भेटीत केंद्रीय मंत्र्यांनी प्रकल्पासंदर्भातील पुढील आवश्यक सुविधांच्या पुरवठ्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. रेल्वे सेवांचा विस्तार हा सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमान उंचावण्यासाठी महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले. उरण-नेरूळ रेल्वे फेऱ्यांमध्ये वाढ होणे हा उरण व आसपासच्या परिसरासाठी विकासाचा महत्त्वाचा टप्पा ठरेल, तसेच दैनंदिन प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित व सोयीस्कर बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलेल्या विशेष सहकार्याबद्दल आमदार महेश बालदी यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानून त्यांना धन्यवाद दिले.



# भावी लोकप्रतिनिधींसमोर विकासाच्या बाबतीत यक्षप्रश्न निर्माण?

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान ।** तब्बल नऊ वर्षांनंतर पार पडलेल्या माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुकीत सर्वसामान्य उमेदवारांपासून ते आर्थिक दृष्ट्या सक्षम असणारे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे ठाकले होते.२ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पूर्ण झाली खरी परंतु त्यापूर्वी एक महिना अगोदर पासूनच बहुतेक उमेदवारांना आपल्या मतदारांना सर्वतोपरी सांभाळून घेण्यासाठी आर्थिक बाबतीत तारेवरची कसरत करावी लागल्याचे चित्र यावेळी स्पष्टपणे दिसून आले.

एकंदरीत इथल्या नव्वद टक्के मतदारांची मनस्थिती पाहता त्यांना या गावाविषयी काडीमात्र सहानुभूती नसून आपल्या मताला काय भाव मिळणार यासाठी काही मतदार शेवटच्या क्षणापर्यंत आपली इच्छित रक्कम प्राप्त करून घेण्यासाठी तत्पर दिसत होते.सभागृहात निवडून जाणारे लोकप्रतिनिधी पाच वर्षांच्या काळात दुपटीने आर्थिक सुबत्ता प्राप्त करणार आहेत त्यामुळे आपण सुध्दा यातील काही रक्कम आपल्या मतांची घेतली तर विशेष काय ह्याच धर्तीवर बहुतांश मतदारांनी उमेदवारांना जेरीस आणले होते. एका उमेदवाराची रक्कम घेऊन सुध्दा दुसरा उमेदवार केव्हा घरी येतोय याची चातकाप्रमाणे प्रतीक्षा करताना काही ठिकाणी मतदार राजा दिसला.

मतदार बिनधास्तपणे आपल्या मतांच्या रक्कमेची मागणी करून सुटकेचा निश्वास सोडत होते.पक्षाच्या बळावर जरी सर्वसामान्य उमेदवारांनी निवडणूक लढवली असली तरी सुद्धा पुढील काळात यामध्ये कुणी सहभाग घेतील की नाही याबाबत प्रश्न उपस्थित केला जात आहे.नगरपरिषदेच्या या निवडणुकीत एका मतांची रक्कम ही एखाद्या शासकीय शिपायांच्या पगाराएवढी अर्थातच तीस हजार रुपयांपर्यंत गेली होती.त्यामुळेच जवळपास सहा कोटी रुपयांचा घोडेबाजार केवळ चार हजार मतांच्या राजकीय खेळात यावेळी सर्वांनाच पहावयास मिळाला आहे.पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असणाऱ्या मतदारांपेक्षाही बाहेर वास्तव्यास असणारे मतदार मोठया प्रमाणात असल्याने काहीजण तीन ते चार दिवस अगोदरच मुक्कामी आले होते.जवळपास नऊ महिने उशीराने निवडणूक आल्याने नव्वद टक्के मतदारांनी व्याजासाहित आपल्या मतांचा मोबदला प्राप्त केला आहे. यांना गावाच्या विकासा बाबतीत काहीएक स्वारस्य दिसत नसून आर्थिक दिवाळी साजरी करण्यात धन्यता मानली गेली आहे. मतदारांची निवडणुकीतील अशाप्रकारे भयावह मनस्थिती पाहता भावी लोकप्रतिनिधींसमोर विकासाच्या बाबतीत यक्षप्रश्न निर्माण झाल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून आले आहे.

# स्विफ्ट गाडी आणि रिक्षाला आग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

करंजाडे सेक्टर ३ येथे आज सकाळी ४ वर्षांपासून बेव-ारस पडलेल्या स्विफ्ट डिझायर आणि रिक्षाला आग लागली होती परंतु आजूबाजूला राहणाऱ्या नागरिकांच्या सावधानतेमुळे लगेचच अग्निशामक दलाला माहिती देऊन आग विझविण्यात आली. प्रत्यक्षदर्शी साहेबराव दाते यांनी त्यांच्या घरातून अच-ानक लागलेल्या आगीची माहिती प्रथमेश पुंडे यांना दिली आणि अग्निशामक दलाच्या मदतीने आग विझविण्यात आली. अग्निशामक दलाचे बंब घटनास्थळी येऊन सदर आगेवर नियंत्रण मिळवले . गाडी मालकाचा शोध पोलीस करीत असून ही आग कशामुळे लागली असावी याचा शोध पोलीस करीत आहेत.

---

मा.सैदाणे साहेब

ॲड.सुनिल एन. मोरे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश (क-स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१६६५/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.२७/०१/२०२६

श्री. महेश रवि जाधव,
वय ३८ वर्षे, व्यवसाय - धंदा,
रा. रुम नं. ५, एफ-१४, तिसरा मजला,
सेक्टर-४ई, कळंबोली, नवी मुंबई,
ता. पनवेल, जि. रायगड- ४१०२१८ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार याची आई कै. उषा रवि जाधव या दिनांक १७/०३/२०२३ रोजी रुम नं. ५, एफ-१४, तिसरा मजला, सेक्टर-४ई, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड येथील राहत्या घरी मयत झाले आहेत. कै. उषा रवि जाधव यांच्या नावाने सिडको कार्यक्षेत्रात खालील वर्णनाची मिळकत सिडकोकडे नोंदीत आहे. सदर मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे. कोर्टास अर्ज केला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड येथील सिडको हद्दीतील,
रुम नं.-५, एफ-१४, तिसरा मजला,
सेक्टर-४ई, कळंबोली, नवी मुंबई,
ता. पनवेल, जि. रायगड,

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्या बाबत कुणाची हरकत असल्यास सदरची हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदाराच्या नावे प्रधान करण्यात येईल.

आज दिनांक ०८/१२/२०२५ रोजी कोर्टाच्या सही शिक्याने दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

---

मा.बडगुजर साहेब

ॲड. मिरदे के.आय.
मो.न. ९८२१४९२१४१

## जाहीर नोटीस

मे. पनवेल येथील दिवाणि न्यायाधीश (व. स्तर) यांचे न्यायालयात

प्रोबेट दि.चौ.अर्ज नं.१४८६/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०१/२०२६

श्री. शंकर लाल चौहान
वय ८५ वर्षे धंदा निवृत्त.
रा. फ्लॅट न. ४०४ ४था मजला विश्वकर्मा टॉवर,
अन्नपूर्णा महिला मंडल अरुणा असफ अली ११५
को. ऑ. हौसिंग सोसायटी लि. प्लॉट न.४ सेक्टर-२१
खारघर ता. पनवेल जि. रायगड महाराष्ट्र-४१०२१० — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार यांची पत्नी कै. वीना शंकर लाल चौहान ही दिनांक ४.८.२०२५ रोजी इ-८०२ के बी रॉयल फीओनीक्स पंचश्लोक रेसिडेंसी जवळ चंदखेडा अहमदाबाद पो. चंदखेडा जि. अहमदाबाद गुजरात-३८२४२४ येथे मयत झाली. कै. वीना शंकर लाल चौहान यांचे नावे असलेल्या मिळकतीबाबत त्यांनी अर्जदार यांचे लाभात दिनांक ६.७.२००९ रोजी मृत्युपत्र करण्यात आलेला असून ते पनवेल दूय्यम निबंधक पनवेल-१ यांच्याकडे नोंदणीकृत करण्यात आलेले असून नोंदणी न. पवल-१-०३९९८-२००९ आहे. यांच्या नावे असलेली स्थावर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे-

**मालमत्ता परिशिष्ट**

फ्लॅट नं. ४०४ ४ था मजला विश्वकर्मा टॉवर अन्नपूर्णा महिला मंडल अरुणा असफ अली को. ऑ. हौसिंग सोसायटी लि. प्लॉट न.४ सेक्टर-२१ खारघर ता. पनवेल जि. रायगड़ महाराष्ट्र-४१०२१० क्षेत्रफळ ५९.५५ चौ. मी. ब्युल्टप एरीया.

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने प्रोबेट मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील प्रोबेट बाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वैगेरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारच्या विनंतीप्रमाणे प्रोबेट देण्यात येईल त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०६/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत गजानन जयराम पाटील यांच्या मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे बांधपाडा येथील मिळकत भूमापन/सर्व्हे नं. २५/१६ यांसी एकूण क्षेत्र ००.०७.१० हे. आर. प्र., पोटखराबा ०.०२.३० हे. आर. प्र., यांसी आकार रक्कम रुपये ०.२६ पैसे, यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीख : ९ डिसेंबर २०२५

**सही/-**
**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारातर्फे वकिल**
**३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर,**
**मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३.**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२.**

---

बोराडे-कपूर सो

अर्जदारतर्फे वकील
ॲड.हर्षदा सुनिल गडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश (व.स्त.) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.१४८८/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.०३/०१/२०२६

१. झाकीर अब्दुल कादीर
S/O अब्दुल कादीर गोलंदाज
वय वर्षेः ५०, धंदाः नोकरी,
सध्या रा. फ्लॅट नं. ४०२, चौथा मजला,
बुबेरे अपार्टमेंट, एम. जी रोड,
कच्छी मोहल्ला, पनवेल, जिल्हा रायगड.
२. मोहम्मद इमरान अब्दुल कादीर गोलंदाज
वय वर्षेः ५७, धंदाः नोकरी,
सध्या रा. फ्लॅट नं. २०७, 'अे' विंग,
दुसरा मजला, पोंड पार्क, करारी बाग, इदगाह
जवळ, टाकीपाडा, नालासोपारा (प) जिल्हा पालघर.
३. मोहम्मद समीर गोलंदाज
S/O अब्दुल कादीर गोलंदाज
वय वर्षेः ५६, धंदाः नोकरी,
रा. फ्लॅट नं. ७०१, 'बी' विंग, न्यू
आकार सोसायटी, नया नगर, हैदरी चौक
समोर, मीरा रोड, जिल्हा ठाणे.
४. शब्लूर परवेज मुसा
पूर्वाश्रमीची शबनूर अब्दुल कादीर गोलंदाज
वय वर्षेः ५३, धंदाः गृहिणी,
रा. रुम नं. १७, तळ मजला, बुटवाला
बिल्डींग, नवपाडा, बांद्रा (पू), मुंबई-५१ — अर्जदार

वरील अर्जदार क्र. १ ते ४ यांची आई सुरैया अब्दुल कादीर गोलंदाज हीचे तारीख ०८/०८/२०१७ रोजी पनवेल येथे निधन झाले. मयत सुरैया अब्दुल कादीर गोलंदाज हीचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

तक्का, पनवेल येथील सिटीएस. नं. १५८७ व १५८८-अ/१ या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या 'रफाई पॅलेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित' या इमारतीमधील फ्लॅट नं. २०१, दुसरा मजला, क्षेत्र ४७.३९ चौ. मीटर बिल्टअप या फ्लॅट/सदनिका मिळकतीचे बदल्यात मिळणारी नवीन इमारतीतील फ्लॅट नं. ३०३, तिसरा मजला, क्षेत्र ६७५ चौ. मीटर बिल्टअप ही सदनिका.

आणि

'रफाई पॅलेस को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड' यांचेकडील शेअर सर्टिफिकेट नं. १४

वरील फ्लॅट मिळकत आणि शेअर सर्टिफिकेट बाबत अर्जदार यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारेची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह या मे. कोर्टात दाखल करावी. वरील पध्दतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ०६ माहे १२ सन २०२५ रोजी रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे-वाशी, तालुका- पेण, जिल्हा- रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत ही १) प्रकाश नारायण म्हात्रे, २ कमलाकर नारायण म्हात्रे, ३) आशाकांत नारायण म्हात्रे, ४) जानकी नारायण म्हात्रे, यांची वडिलोपार्जित मालकीची मिळकत आहे.

**सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे: -**
**मौजे : वाशी, ता. पेण, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | पो.ख. | एकूण क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|---|
| वाशी | २०६ | २ | ०.२८.३० | ०.०६.१० | ०.३४.४० | ०.५८ |

नमुद केलेली मिळकत ही वरील कब्जेदारांच्या मालकी हक्कात व कब्जे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबद्दल विद्यमान मालकाने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनचिठ्ठी, साठेकरार, खरेदीखत, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्गेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकीत दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या हरकती खालील पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहित धरून तसेच त्यासंबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहित धरण्यात येईल, तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात घेतलेली हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हे सर्वांस कळावे.

सदरची पेपर नोटीस देण्यात माझी कोणत्याही प्रकारची अडचण किंवा तक्रार नाही, म्हणून मी या जाहीर नोटीसीवर सही करत आहे.

ठिकाण : पेण
दिनांक : ९/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.हिंदवी पाटील**
**मो.नं.९३२६७९७२००**

---

Adv. Laxmi M. Kale

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION AT : PANVEL

Civil M.A. No.1482/2025
Exh No.8/D
N.D. 12/01/2025

MRS. RUPALI DEVIDAS MHATRE
D/O. Padamakar Harichandra Patil
Age: 44 years, Occ: house wife,
Residing At: B-302, Sai Krupa building,
Plot No. 381, Sector: 19, Koparkhairne,
Thane, Navi Mumbai-400 709. — Applicant

V/S

NIL — Opponent

That deceased LATE SMT. SHEELA PADMAKAR PATIL who died on 01/03/2025 at Tata Memorial Centre Actrec, Kharghar, Tal: Panvel, Dist: Raigad-410210. The above said deceased is mother of applicant. The Property Description Standing in The Name of Deceased LATE SMT. SHEELA PADMAKAR PATIL Is Attached Herewith.

**SCHEDULE OF PROPERTY: A**

Property Holder: LATE SMT. SHEELA PADMAKAR PATIL Flat No. 701, 7th Floor, B-Wing, Sheth Narayan Park Co.Op. Housing Society Ltd., Plot No. E-2 And E-4, Sector: 3, Belpada-Kharghar, Tal - Panvel, Dist: Raigad - 410206. Admeasuring about:1040 sq. ft. Approximately Agreement Value of Rs.0/- ( Rupees zero only).

**SCHEDULE OF PROPERTY: B**

Flat No. 702, 7th Floor, B-Wing, Sheth Narayan Park Co.Op. Housing Society Ltd., Plot No. E-2 and E-4, Sector: 3, Belpada-Kharghar, Tal - Panvel, Dist: Raigad - 410206. Admeasuring about: 1040 sq. ft. Approximately Agreement Value of Rs. 0/-(Rupees Zero only).

Whereas the above-named applicants have filed present misc. application for heirship certificate under Bombay regulation VIII of 1827, the court of Civil Judge (S.D.) Panvel,. Tal: Panvel, Dist: Raigad

You the members of public are hereby given notice to appear in the court of Civil Judge (S.D.) Panvel, Tal: Panvel, Dist: Raigad in person or by pleader duly instructed and to file your say/ objections if any notice within 30 days from the date of publication of public notice, failing which they said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hands and seal of the court this 06 Day of 12/2025

**SD/-**
**Jr.Clerk**
**Civil Court S.D.**
**Panvel**

Court Seal

**SD/-**
**Asst.Supted.**
**Civil Court S.D.**
**Panvel**

---

श्री.राणे सो

ॲड.उज्वला शिंदे / साळुंखे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर सो पनवेल

दि.चौ.अर्ज क्रं.१५२८/२०२५
नि.नं.८
ने.ता.२१/०१/२०२६

१) श्रीमती. उषा दिलीप देसले
वय. ५७ वर्ष, धर्म हिंदू,
२) योगिता दिलीप देसले उर्फ
सौ. योगिता अजय यादव
वय. ३८ वर्ष, धर्म हिंदू,
३) कविता दिलीप देसले उर्फ
सौ. कविता संदिप संकपाळ
वय. ३७ वर्ष, धर्म हिंदू,
४) नितीन दिलीप देसले
वय. ३३ वर्ष, धर्म हिंदू
अ.नं. १,३ व ४ रा. बी.एस.एन.एल. ऑफीस शेजारी,
प्लॉट नं १०, से. १२, रोड नं. १६, नवीन पनवेल (पू),
ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६
अ.नं. २) रा. व्दारका निवास, बी.एस.एन.एल.
ऑफीस समोर, प्लॉट नं ०४, से.१२, रोड नं. १६,
नवीन पनवेल (पू), ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ — सर्व अर्जदार

विरूध्द

कोणी नाही

कै. दिलीप जयराम देसले यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

१. शॉप नं. १३, पहिला मजला, सत्यम प्राईड, प्लॉट नं. १४० बी, सेक्टर-१-एस, नवीन पनवेल (पू), ता. पनवेल, जिल्हा रायगड क्षेत्र २५.७०५ स्के. मी कारपेट + ५.२६१ स्के. मी बालकणी.

२. सदनिका नं. १०३, पहिला मजला, सागर दर्शन को ऑप हौ सोसा लि, प्लॉट नं. ए-२३-ए, सेक्टर-१२ (बी यु डीपी), खारघर, नवी मुंबई, ता. पनवेल, जिल्हा रायगड, क्षेत्र ५३० स्के. फीट. बांधीव.

३. प्लॉट नं. १० क्षेत्र १२०० स्के. मी. व त्यावरील तळ मजला पहिला मजला, क्षेत्र ९१.५९२ स्के. मी या बांधकामासहीत, रोड नं. १६, से.१२, नवीन पनवेल (पू), ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६

४. सदनिका नं. २६, दुसरा मजला (तिसरा मजला), गोकुलधाम अपार्टमेंट, प्लॉट नं.३, स. नं. २९०/१+२+३+४/८/२/३, पाथर्डीए, नाशिक महानगरपालीका हद्दीमधील, क्षेत्र ४३.२३ स्के. मी. कार्पेट.

५. एम. एच. ४६क्यू ०११६ नंबर असणारी, सी बी शाईन या मॉडेलची, होंडा कंपनीची, काळ्या कलरची, त्याचा चेस नं. एम ई ४जे सी ३६ डी के बी बी १८४७१२ ही दुचाकी.

वरील अर्जदार नं १) श्रीमती. उषा दिलीप देसले या कै. दिलीप जयराम देसले यांच्या पत्नी आहेत, अर्जदार क्र.२) योगिता दिलीप देसले उर्फ सौ. योगिता अजय यादव व ३) कविता दिलीप देसले उर्फ सौ. कविता संदिप संकपाळ या दोन त्यांच्या मुली आहेत व अर्जदार क्र.४) नितीन दिलीप देसले हा मुलगा आहे.

कै. दिलीप जयराम देसले यांचे दि. २२/०४/२०२५ रोजी जम्मू कश्मीर मधील बैसरण येथे, पहलगाम हल्ल्यामधे निधन झाले आहे. कै. दिलीप जयराम देसले यांचे निधनानंतर त्यांच्या मृत्युची नोंद पहलगाम महानगरपालिका, येथे केलेली आहे व पहलगाम महानगरपालिकाने त्यांच्या मृत्यूचा दाखला दिलेला आहे. सदर दाखला अर्जासोबत जोडलेला आहे.

वरील उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळविण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल आणि वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तकार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिदध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत हया न्यायालयात हजर होऊन दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि. ०१/१२/२०२५ रोजी सहीने व कोर्टाचे शिक्कयानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# पेण तालुक्यात फॉर्मर कप शेतकरी प्रशिक्षण उत्साहात

**दै.रायगड नगरी । दिपक लोके**

**पेण ।** महाराष्ट्र शासन कृषी विभाग व पानी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सत्यमेव जयते फार्मर कप' अंतर्गत महात्मा गांधी वाचनालय येथे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. तालुक्यातील विविध गावांतील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी पेण श्री सागर वाडकर यांनी केले व फार्मर कप चे महत्व शेतकऱ्यांना पटवून दिले तसेच पुढे होणाऱ्या निवासी प्रशिक्षण व फार्मर कप मध्ये शेतकऱ्यांना सहभागी होण्याबाबत आवाहन केले. प्रशिक्षण सत्रात पाणी फाऊंडेशनच्या प्रतिनिधी श्री आशिष लाड व भक्ती कुटे यांनी खरीप हंगाम २०२६ पासून सुरू होणाऱ्या 'फार्मर कप' स्पर्धेबाबत सविस्तर माहिती दिली. व विविध गटांच्या योशो-गाथा व्हिडिओ चे माध्यमातून शेतकऱ्यांना दाखवण्यात आल्या. गटशेती ही काळाची गरज असून, गटाच्या माध्यमातून शेतीचा विकास, कमी खर्चात अधिक उत्पादन आणि शाश्वत शेतीच्या दिशेने वाटचाल शक्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या स्पर्धेसाठी तालुक्यातून निवडण्यात येणाऱ्या १०० शेतकऱ्यांना तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण दिले जाणार आहे. हे प्रशिक्षण इतके प्रेरणादायी व ज्ञानसंपन्न असणार आहे की हे शेतकरी गावी परत आल्या नंतर नक्कीच स्वतःचा शेतकरी गट तयार करून 'फार्मर कप' स्पर्धेत सहभागी होणार होतील अशी खात्री त्यांनी दिली. प्रशिक्षणात निवासी शिबिराची संपूर्ण माहिती देण्यात आली.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.महादु भिवाजी मेंगाळ व श्री भिवा सोन्या मेंगाळ यांना, युनिट नं. ११, (सदनिका क्रमांक - बी - २०४), दुसरा मजला, पंचशिल को. ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड, प्लॉट नं. डी-३२, सेक्टर-६, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि.रायगड, क्षेत्र २४. ०० चौ. मी. बिल्ट अप (यापुढे उपरोक्त नमुद मिळकतीस सोयीसाठी सदरहू युनिट असा केला आहे) हे युनिट श्री छत्रसिंग प्रतापसिंग मेहरा व श्री प्रतापसिंग कल्याणसिंग मेहरा यांच्याकडुन विकत घेण्याची इच्छा आहे. वरील युनिट हे माझे अशिल यांनी विकत घेण्याची ठरविले आहे. तरी या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर युनिट खरेदीचा व्यवहार माझ्या अशिलांनी वरील इसमाबरोबर करण्याचे ठरविले आहे. तत्पूर्वी सदर कराराची पूर्तता करणे, तसेच सदर युनिट हस्तांतरित करण्यापुर्वी ती निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे. जर सदरहू युनिट वर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास योग्य त्या कायदेशीर कागदपत्रासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी पत्रानिशी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही तर सदरहू युनिट चा खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

कळावे

दि.०९/१२/२०२५

सही/-

**ॲड.उज्वला दंडवते**

**शॉप नं.८, तळ मजला, सिमरन पार्क को. ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड, भूखंड क्रमांक-९९ व १००, सेक्टर - ८, नवीन पनवेल ईस्ट, ता . पनवेल, जि.रायगड**

ॲड. सुचिता सत्यवान पाटील
अर्जदार तर्फे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथिल मे. सिव्हील जज्ज (सि.डी) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.१५४२/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.०३/०१/२०२६

कै. रमाबाई दत्तात्रय भातखंडे (मयत) चे वारस
१ ) श्री. माधव दत्तात्रय भातखंडे
वय ८८, धंदा नोकरी
रा. फ्लॅट नं.४, बिल्डींग नं.२, एव्हरेस्ट को. ऑप.
हौ. सो. दिनदयाल रोड, डोंबीवली वेस्ट,
विष्णु नगर, कल्याण, ठाणे ४२१२०२
२) श्रीम. स्मिता प्रभाकर भातखंडे
वय- ७७, धंदा घरकाम
रा. फ्लॅट नं.११, श्री राम कृष्ण नगर बिल्डींग,
रामभाऊ म्हाळगी रोड, सदगुरु सोसायटी च्या समोर,
ठाणे वेस्ट ठाणे ४००६०३
३) श्रीम. निता केशव भातखंडे
वय ८०, धंदा घरकाम
४) श्री. वरदराज केशव भातखंडे
वय- ५०, धंदा नोकरी
अर्जदार क्र.३ व ४ दोघे रा. फ्लॅट नं.१५
अनंत आनंद को. ऑप. हौ.सो. वृंदावन,
ऋतु पार्क जवळ, ठाणे पश्चिम, ठाणे ४००६०१
५) श्रीम. उमा संतोष सावंत
वय- ५७, धंदा नोकरी
रा.बी-२१, कबीर को. ऑप. हौ.सो. मोगल लेन,
शितला देवी मंदीर, माहीम वेस्ट, मुंबई ४०००१६ अर्जदार

ह्या जाहीर नोटीसीने सर्व जनतेस असे कळविणेत येते की, कै. रमाबाई दत्तात्रय भातखंडे हया दिनांक १९/०३/२००९ रोजी मौजे - ओम रुग्णालय डोंबिवली, जि ठाणे येथे मयत झाल्या आहेत. त्यांना अर्जदार १) श्री. माधव दत्तात्रेय भातखंडे रा. फ्लॅट नं.४, बिल्डींग नं.२, एव्हरेस्ट को.ऑप. हौ.सो.दिनदयाल रोड, डोंबीवली वेस्ट, विष्णु नगर, कल्याण, ठाणे ४२१२०२,२) श्रीम. स्मिता प्रभाकर भातखंडे रा. फ्लॅट नं.११, श्री राम कृष्ण नगर बिल्डींग, रामभाऊ म्हाळगी रोड, सदगुरु सोसायटीच्या समोर, ठाणे वेस्ट ठाणे ४००६०३ ३) श्रीम. निता केशव भातखंडे ४) श्री. वरदराज केशव भातखंडे अर्जदार क्र.३ व ४ दोघे रा. फ्लॅट नं.१५, अनंत आनंद को. ऑप. हौ. सो. वृंदावन, ऋतु पार्क जवळ, ठाणे पश्चिम, ठाणे ४००६०१,५) श्रीम. उमा संतोष सावंत रा. बी- २१, कबीर को. ऑप. हौ.सो. मोगल लेन, शितला देवी मंदीर, माहीम वेस्ट, मुंबई ४०००१६ हे वारसदार आहेत. कै. रमाबाई दत्तात्रय भातखंडे त्यांचे मृत्युसमयी त्यांचे नावे खाली वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांचे नावे होती व आहे.

**मिळकतीचे वर्णन ता. पनवेल, जि. रायगड**

| गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| लोणिवली | १५१ | ६ | ०-७-६० | ०.१६ |
| लोणिवली | १६७ | ४ | ०-१०-६० | ०.४७ |
| लोणिवली | १४१ | ५ | ०-६-० | ०.२५ |
| लोणिवली | १६१ | ५ | ०-१-५० | ०.१२ |
| बेलवली | ४२ | १ | ०-५-६० | ०.९४ |
| बेलवली | १६७ | १ | ०-१-३० | ०.१२ |

येणेप्रमाणे मिळकती असुन सदरहू मिळकतीच्या ७/१२ सदर कै. रमाबाई दत्तात्रय भातखंडे यांच्या वारसांची नोंद करण्याकामी अत्यावश्यक तो वारसदाखला मिळावा म्हणून या न्यायालयांत अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

सबब कै. रमाबाई दत्तात्रय भातखंडे यांच्या वारसाहक्कासंबंधित अन्य कुणासही हरकत घेण्याची असल्यास अशा संबंधीत व्यक्तिंनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासुन ३० दिवसांच्या आंत लेखी हरकती स्वतः अगर वकिलांमार्फत सादर कराव्यात.

सदर नोटीशीच्या मुदतीत् अन्य कोणाची हरकत वगैरे न आल्यास आणि अर्जदार यांनी दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास या अर्जदारांच्या लाभांत वारसदाखला दिला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सही निशी व कोर्टाच्या शिक्यानिशी आज ता. ०६/१२/२०२५ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री विपुल सुधाकर भोगे व श्री सुधाकर गोविंदा भोगे यांना, युनिट / सदनिका क्रमांक - ८, दुसरा मजला, ए विंग , साई रत्न को. ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड, प्लॉट नं. डी - ३६, सेक्टर - ६, नवीन पनवेल ईस्ट, ता. पनवेल, जि. रायगड. क्षेत्र २४ चौ. मी. कारपेट (यापुढे उपरोक्त नमुद मिळकतीस सोयीसाठी सदरहू युनिट / सदनिका असा केला आहे) हे युनिट / सदनिका श्री मुकेश मिश्रा व श्रीमती बाबी एम मिश्रा यांच्याकडुन विकत घेण्याची इच्छा आहे. वरील युनिट / सदनिका हे माझे अशिल यांनी विकत घेण्याची ठरविले आहे. तरी या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर युनिट / सदनिका खरेदीचा व्यवहार माझ्या अशिलांनी वरील इसमाबरोबर करण्याचे ठरविले आहे. तत्पूर्वी सदर कराराची पूर्तता करणे, तसेच सदर युनिट / सदनिका हस्तांतरित करण्यापुर्वी ती निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे. जर सदरहू युनिट / सदनिका वर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास योग्य त्या कायदेशीर कागदपत्रासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात ) दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी पत्रानिशी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही तर सदरहू युनिट / सदनिका चा खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल यांची नोंद घ्यावी,

कळावे

दि.०९/१२/२०२५

सही/-

**ॲड.उज्वला दंडवते**

**शॉप नं.८, तळ मजला, सिमरन पार्क को. ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड, भूखंड क्रमांक-९९ व १००, सेक्टर - ८, नवीन पनवेल ईस्ट, ता . पनवेल, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

**उप विभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात**

On Admission आरटीएस अपिल क्र...../२०२५

१. सौ. अलका दत्तात्रेय जुनघरे
रा- ज्ञानदिप शाळेच्या बाजुला, रुम नं. ए १३८३,
सिडको कॉलनी, उपविभागीय अधिक सेक्टर०२,
ऐरोली ठाणे, ४१०२०६४
२. सौ. रेश्मा श्रीकांत बेलोशे,
रा मु. केळघर, ता. जावली केळघर तर्फे मेढा,
सातारा महाराष्ट्र ४१५०१२.
३. श्री. नरेश आनंदा शेलार,
रा- केदारनाथ हाउसिंग सोसायटी, प्लॉट नं. बी४६१,
घनसोली नवी मुंबई, महाराष्ट्र ४००७०१,
४. श्री. दत्तात्रेय तानाजी मोरे,
रा- बी ११, प्लॉट नं.५, विंग, मुलुंड एकता
सी एच एस म्हाडा कॉलनी, मुलुंड, महाराष्ट्र
५. श्री. धनंजय संजय भिलारे,
रा. मु.पो. भिलार, ता. महाबळेश्वर भिलार,
सातारा, महाराष्ट्र ४१२८०५
६. श्री. सुर्यकांत तानाजी उंबरकर,
रा- मु. डांगरेघर, सातारा, केळघर, महाराष्ट्र ४१५०१२
७. श्री. रुपेश रमेश दानवले,
रा- मु. दानवली, पो भिलार महाबळेश्वर, सातारा, महाराष्ट्र
८. श्रीम. रत्ना महेश जगताप
रा. स्वाती निवास, घर नं. १०९४ तायमा मंदिराच्यामागे,
घाडगेनगर, अंबरनाथ, ठाणे, महाराष्ट्र ४२१५०१
९. श्री. महेश कुंडलिक पिसाळ,
रा इंदिरानगर, जे एन रोड मुलुंड वेस्ट, महाराष्ट्र ४०००८०
१०. सौ ममता रानी देवांगन,
रा - २२९ लक्ष्मीनिवास लिलाबाग रोड,
विनोबा बार्ड नं ३१ बैतुल, मध्य प्रदेश ४६०००१,
११. श्री. संजय बाबाजी शिंगाडे
रा-घर नं २१११, बुवा वाडी, विठ्ठल रुख्मिणी मंदिरजवळ,
घनसोली गांव, नवी मुंबई, घनसोली, ठाणे, महाराष्ट्र ४०००८०
१२. सौ. ऋषिका संजय राणे,
रा. रुम नं. २०००, बि नं ७६,
अक्षय को. ऑ. हौ सो बेस्ट टर्मिनसजवळ,
कन्नमवार विकोळी, पूर्व महाराष्ट्र ४०००८६. वादी

विरुध्द

१. मंडळ अधिकारी कोप्रोली, ता. उरण, जि. रायगड.
२. तलाठी सजा वशेणी, ता.उरण, जि.रायगड.
३. श्रीमती. पद्मावती जर्नादन पाटील,
४. श्रीमती. कलावती जिवन गावंड,
५. श्री. दर्शन निवास म्हात्रे,
६. श्री. रुपेश जनार्दन पाटील,
३ ते ६ तर्फे अखत्यारी श्री. किसनराव धावजी राठोड
राः सदनिका क्र. २०१, टॉवर क. ३०, सिवूड इस्टेट,
एन.आय. आर. कॉलनी, सेक्टर-५४,५६,५८, नेरुळ ४००७०६.
७. मुंबई एस.ई. झेड लि. तर्फे अधिकृत प्रतिनिधी
श्री. निलेश मधुकरराव कडू,
रा : एन.एम.एस.ई.झेड हाउस, सेक्टर- १०बी,
कोपर-न्हावारोड. शिवाजी नगरजवळ, उलवे,
नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड प्रतिवादी

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीव्दारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे सारडे, ता. उरण, जि. रायगड येथिल फेरफार नोंद क्र. १३७१ चे विरुध्द अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तूतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यांत आलेल्या आहेत प्रस्तूत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दिनांक १५/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीव्दारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमिन मिळकतीशी संबधित असलेल्या व्यक्तीनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यकत्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे- सारडे, ता.उरण, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ४२ | १ | १.३७.०० | १.८७ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- ०३/१२/२०२५

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**

# संत संताजी जगनाडे महाराज जयंती निमित्ताने मुख्यालयात अभिवादन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

संत संताजी जगनाडे महाराज जयंती निमित्ताने आज महापालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त अभिषेक पराडकर, उपायुक्त नानासाहेब कामठे, सामान्य प्रशासन किर्ती महाजन, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रो.जमा.६-२५

अर्जदार तर्फे वकील
अभिलाषा चंद्रकांत म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. सिव्हील जज्ज (सि.डी.) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.१३९७/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.०६/०१/२०२६

१) मेघा अविनाश मोडक
वय : ६० वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.१५१, श्रीनिवास पांडुरंग नाईक रोड,
शिवाजी पार्क माहिम, माहिम,
एच.ओ.मुंबई, महाराष्ट्र-४०००१६
२) श्रीमती.विणा पुजारी
वय : ६४ वर्षे, धंदा : नोकरी
रा.१५१, श्रीनिवास पांडुरंग नाईक रोड,
शिवाजी पार्क माहिम, माहिम,
एच.ओ.मुंबई, महाराष्ट्र-४०००१६
३) श्री.गिरीश अविनाश मोडक
वय : ५२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.१५१, श्रीनिवास रोड नं.५,
मुंबई माहिम, मुंबई शहर, महाराष्ट्र-४०००१६
४) मिनल देवीदास वर्टी (मयत) तर्फे
४/१) श्री.देवीदास श्रीधर वर्टी
वय : ७४ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
रा.घर नं.ए/१, रत्न सोसायटी, रस्ता-१८६,
विर सावरकर मार्ग, हिंदुजा हॉस्पिटल जवळ,
माहिम, मुंबई, मुंबई सिटी, पोस्ट ऑफिस
माहिम, महाराष्ट्र-४०००१६
४/२) प्रिती परीमी
वय : ४१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.७-१, पोरांकी (गाव), पोरांकी,
क्रिष्णा, आंध्र प्रदेश ५२११३७ अर्जदार

ज्याअर्थी श्रीमती.शिला अविनाश मोडक यांचे नावे झाले आहेत. ह्या या दि.०९/०४/१९९८ रोजी शुश्रुषा हॉस्पिटल येथे मृत्यू पावल्या आहेत. परंतु त्यांचे पती श्री.अविनाश दिनकर मोडक हे दि.१६/०९/१९९२ रोजी मयत झाले आहेत. तर मयत कै. शिला अविनाश मोडक यांची मुलगी कै.मिनल देवीदास वर्टी ही दि.३०/०७/२०२२ रोजी मयत पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : धानसर, ता.पनवेल, जि.रायगड येथील**
**शेतजमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे**

| अ.क्र. | गट नं./हिस्सा नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| १ | १८०/३/१ | ०-०५-३०<br>पो.ख. ०-०१-१०<br>एकूण क्षेत्र ०-०६-४० | १.०६ |
| २ | १४८/१/अ | ०-३०-३०<br>पो.ख. ०-०३-३०<br>एकूण क्षेत्र ०-३३-६० | ४.१० |
| ३ | १६९/७ | ०-१३-२०<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण क्षेत्र ०-१४-२० | २.८१ |
| ४ | १६९/१/१ | ०-०५-६०<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण क्षेत्र ०-०६-६० | १.१९ |
| ५ | १६९/१०/१ | ०-३५-३०<br>पो.ख. ०-०२-३०<br>एकूण क्षेत्र ०-३७-६० | ७.३७ |
| ६ | १५६/६/२ | ०-५३-१०<br>पो.ख. ०-०२-५०<br>एकूण क्षेत्र ०-५५-६० | ४.५६ |
| ७ | १५६/६/१ | १७-२०-०० | १७२.०० |
| ८ | १५६/३ | ०-४६-३०<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण क्षेत्र ०-४६-३० | ३.३७ |
| ९ | १५६/४/१ | ९७८-००-०० | ९८८०.०० |

**मौजे : आडीवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील**
**शेतजमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे**

| अ.क्र. | गट नं./हिस्सा नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| १ | १३८/ब | ०-२०-०० | ०.०० |
| २ | १३८/अ/२ | १५१-००-०० | १५१०.०० |
| ३ | १३९ | ०-५३-८०<br>पो.ख. ०-०२-३०<br>एकूण क्षेत्र ०-५६-१० | ९.६२ |
| ४ | १३७ | २०४-१०-०० | २०४१.०० |
| ५ | १३८/अ/१ | १६४-६०-०० | १६४६.०० |

कै.शिला अविनाश मोडक यांचे पती कै.अविनाश दिनकर मोडक व त्यांची मुलगी कै.मिनल देवीदास वर्टी त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज कीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०८/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## CHANGE IN NAME

I, EZA VISHWABHUSHAN MALLICK, R/o Keni Sadan CHS, Room no. -103, Sukapur, New Panvel, Dist- Raigad, Maharashtra- 410206, do hereby declare that I am changing my name from 'EZA KUMARI VISHWABHUSHAN MALLICK/ EZAKUMARI VISHWABHUSHAN MALLICK', to 'EZA VISHWABHUSHAN MALLICK' As per Affidavit No. 99/2025 ( Dt. 8th December, 2025 at Panvel) for passport issuance. I further declare that the name EZA KUMARI VISHWABHUSHAN MALLICK/ EZAKUMARI VISHWABHUSHAN MALLICK and EZA VISHWABHUSHAN MALLICK, is the name of one and the same person and that is myself.

## जाहीर नोटीस

**उप विभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात**

On Admission आरटीएस अपिल क्र...../२०२५

१). श्री. संजय श्रीधर ठोंबरे
रा. रूम नं३०६, बी विंग, रामदास अपार्टमेंट,
विटावा, जकात नाका जवळ, विटावा,
सूर्य नगर, ठाणे, ठाणे-४००६०५.
२) श्री. संदीप सुरेश कदम,
पत्ता : रूम नं००४१३/एसी-१, सिद्धिविनायक
सी.एच.एस. चांदिवली फार्मरोड, संघर्ष नगर,
अंधेरी ईस्ट, साकी नाका, मुंबई, ४०००७२.
३) श्री. विजय बाळाराम कांबळे,
पत्ता :- कुणाल निवास, सेक्टर १२ बी, प्लॉट नं४३,
कोपर खैरणे, नवी मुंबई, ठाणे-४००७०९.
४) श्री. नितीन मोहन गंजे,
पत्ता :- रूम नं ७०९, पोलनं१८, मधुकर सुतार चाळ
जवळ, गावदेवी मंदिर पवणेगाव, लातूर. ४३१५२२.
५) श्रीमती. दिपाली अजय मराठे,
पत्ता :- ७३९/४५, पाटील प्लॉट, शिवाजी नगर,
बार्शी, सोलापूर, ४१३४०१
६) श्री. प्रदीप केशव कांबळे,
पत्ता :-३०२, आशीर्वाद पॅलेस, अभयंकर रोड,
धंतोली, नागपूर, सुळे विद्यालयजवळ,
पटवर्धन ग्राउंड, नागपूर, ४४००१२
७) श्री. राजेंद्र विष्णू रणनवरे
पत्ता :- सी, ५० पर्ल हेवत बिल्डींग,
विक्रोळी गाव, गोदरेज हॉस्पीटल
जवळ विक्रोळी पूर्व मुंबई, ४०००७९
८) श्री. प्रकाश विष्णु रणनवरे,
पत्ता :- विजय अपार्टमेंट, ब्लॉक नं. १६,
लालू बहादूर शास्त्री मार्ग, आराधना टॉकिज जवळ,
नौपाडा, ठाणे, ४००६०२
९) श्री. योगेश मोहनलाल जाधव
पत्ता : अमरनाथ हाईटस्, फ्लॅट नं. ३०१,
कलांबा रस्ता, अमरनाथ मंदिर, गणेश कॉलनी,
कळंबा कोल्हापूर, ४०००८९.
१०) श्री. सुजाता श्रीकांत रणदिवे,
पत्ता :- अमृतानंद शाळेसमोर, सी. २६/६
बोम श्री अष्टविनायक सो. सेक्टर २४,
गावदेवी चौक जुईनगर, नेरुळ नोड-३, ४००७०६
११) श्री. श्रीकांत लक्ष्मण रणदिवे
१० व ११ यांचा पत्ता :- अमृतानंद शाळेसमोर,
सी. २६/६ओम श्री अष्टविनायक सो. सेक्टर २४,
गावदेवी चौक जुईनगर, नेरुळ नोड-३, ४००७०६
१२) श्री. सदाशिव शंकर अप्पा वाघमारे
पत्ता :- बी १७३, गार्डन सिटी, वालीया रोड जवळ,
कोसम्दी अंकलेश्वर, भरुच, गुजरात, यभरूच, ३९३००१.
१३) श्रीमती. निशा अविनाश पाटील,
१४) श्री. अविनाश बारसू पाटील
१३ व १४ पत्ता :- सी १४/०२, स्वामी सीएचएस,
अम्रीता विद्यालयम जवळ, सेक्टर २४, जुईनगर,
नवी मुंबई, नेरुळ नोड-३, ४००७०६०
१५) श्रीमती कल्याण श्रीपती शिखरे,
पत्ता - शेरावती ए/२१, रजनीगंधा, न्यु मंडाळा मुंबई
अणूशक्ती नगर, कुर्ला मुंबई, ४०००९४.
१६) श्री. विवेक बाताजी बिराजदार,
पत्ता-घर नं. ४५९, रामूशेठ चाळ,
कामत घर रोड, न्यु ताडाळी, हनुमान मंदिरजवळ,
भिवंडी, ठाणे, ४२१३०५.
१७) श्रीमती. मंजुषा सुभाष वर
पत्ता- ऐश्वर्या हाईट, रुम नं. ३०५, १०० फुटीरोड,
तीसगाव, कल्याण ईस्ट, ठाणे. ४२१३०६.
१८) श्री. गणेश बालाजी रणक्षेत्रे
पत्ता - मु.पो. कुमठाखू, उदगीर, कुमठाखू, लातुर, ४१३५१७.
१९) श्री. सुषाष धर्माजी मांजरेकर
पत्ता - बी.डी.डी. चाळ नं. ११, रुम नं. ४७, डॉ. जी. एम.
भोसले मार्ग, जांबोरी मैदान जवळ, वरळी मुंबई, ४०००१८ वादी

विरुद्ध

१. मंडळ अधिकारी जासई, ता. उरण, जि. रायगड.
२. तलाठी सजा विंधणे, ता.उरण, जि.रायगड.
३. श्रीमती. राधाबाई भास्कर घरत
रा.हरिश्चंद्र पिंपळे, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड.
४. श्रीमती नंदाबाई अभिमन्यू पाटील,
५. श्रीमती राघुबाई प्रकाश बाईत,
४ व ५ रा. एसएस-२/ए, रुम नं. ५५५, सेक्टर-१८,
नवी मुंबई, कोपरखैरणे-४००७०९ प्रतिवादी

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीव्दारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे विंधणे, ता.उरण, जि. रायगड येथिल फेरफार नोंद क्र. ५७७५ दि. ०३/११/२०२२ चे विरुध्द अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तूतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यांत आलेल्या आहेत प्रस्तूत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दिनांक २२/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीव्दारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमिन मिळकतीशी संबधित असलेल्या व्यक्तीनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यकत्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे- विंधणे, ता.उरण, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ११७ | १/अ/१ | १.९३.४० | ५.३७ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- ०३/१२/२०२५

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**

# सिडकोतर्फे देशातील पहिला आयकॉनिक मल्टिपर्पज इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेना नवी मुंबईमध्ये उभारण्याच्या प्रक्रियेला सुरुवात

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**


दूरदर्शी नियोजनाद्वारे व विशिष्ट उद्देशाने विकसित करण्यात आलेले नवी मुंबई हे देशाच्या नगर नियोजनाला नवीन दिशा देणारे शहर ठरले आहे. भविष्यातील शहर म्हणून संकल्पित असलेली नवी मुंबई वर्तमानातील शहर म्हणून दिमाखाने झळकत आहे. हे परिवर्तन घडवून आणण्यासह देशातील थेट करमणूक क्रांतीचा केंद्रबिंदू म्हणून नवी मुंबईला नावारूपाला आणत असल्याचा सिडकोला सार्थ अभिमान आहे.

या संदर्भातील एक महत्त्वाचे पाऊल म्हणून देशा-तील पहिला आयकॉनिक मल्टिपर्पज इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेना नवी मुंबईमध्ये उभारण्यासाठी सिडकोतर्फे स्वारस्य अभिव्यक्ती जारी करून प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. स्वारस्य अभिव्यक्ती दस्तऐवज दि. ९ डिसेंबर २०२५ पासून ऑनलाइन उपलब्ध असणार असून निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत (भारतीय प्रमाण वेळ) आहे.

न्यूयॉर्क येथील मॅडिसन स्क्वेअर गार्डन आणि लंडन येथील ओटू अरेना या बहुउद्देशीय नाट्यगृहांपासून प्रेरणा घेऊन विकसित करण्यात येणारा हा प्रकल्प देशातील करमणूक पायाभूत सुविधांमध्ये नवीन मानदंड प्रस्थापित करणार आहे. रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या संगीतसभा, आंतरराष्ट्रीय क्रीडाविषयक कार्यक्रम, भव्य स्तरावरील सांस्कृतिक महोत्सव आणि आभासी अनुभव यांच्या आयोजनाकरिता २०,००० प्रेक्षकांसाठी आसन व्यवस्था आणि २५,००० उभे प्रेक्षक इतकी क्षमता या ठिकाणी असणार आहे. यामुळे हा देशातील पहिला जागतिक दर्जाचा व भव्य क्षमता असणारा इनडोअर अरेना असणार आहे.

अटल सेतू ट्रान्स-हार्बर लिंक, हाय स्पीड रेल्वे मार्ग आणि नवी मुंबई मेट्रो यांद्वारे अखंड आणि वेगवान कनेक्टिव्हिटी सुनिश्चित झाली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाद्वारे करमणूक



व्यवस्थापन (लॉजिस्टिक्स), आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलाकारांकरिता परिवहन आणि प्रसार माध्यम उत्पादन क्षमता यांमध्ये क्रांतिकारी परिवर्तन घडून येणार आहे. नेरूळ जेट्टीद्वारे पर्यटन, जलवाहतूक आणि चित्रपट निर्मितीच्या संधींमध्ये वाढ होणार आहे. फिफा मानकांचे अनुपालन करणाऱ्या चार खेळपट्ट्या आणि ४,००० आसन क्षमतेचे स्टेडियम असणारे खारघर येथील सेंटर ऑफ एक्सलन्स आणि १८ होल्सचे खारघर व्हॅली गोल्फ कोर्स यांनी नवी मुंबईचे क्रीडा व करमणूक क्षेत्रातील स्थान अधिक बळकट केले आहे.

आगामी मेडि सिटी, एज्यु सिटी आणि एरो सिटी प्रकल्पांद्वारे नवी मुंबईचे एकात्मीक नगर विकास प्रारूप अधिक उठावदार होणार आहे. उद्योग क्षेत्रातील प्रतिष्ठित हितसंबधींसोबत (डींग्ज़शहेश्रवशीं) भागीदारी करून जागतिक दर्जाचे ज्ञान व परिचालन क्षमता आणून देशातील करमणूक क्षेत्राच्या भविष्याला आकार देण्याचा सिडकोचा प्रयत्न आहे.

हा उपक्रम केवळ अरेना विकसित करण्यापुरता मर्यादित नसून सांस्कृतिक व आर्थिक चळवळीची ही सुरुवात आहे. या प्रकल्पाद्वारे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती, पर्यटनाला चालना, नवीन उद्योगांच्या संधींची निर्मिती होणार असून देशातील थेट करमणूक, जागतिक कार्यक्रम आणि आभासी अनुभव प्रदान करणारे अग्रणी शहर म्हणून नवी मुंबईचे देशामध्ये स्थान निर्माण होणार आहे.

> नवी मुंबईला जागतिक दर्जाचे करमणूक केंद्र व उत्कृष्ट शहर म्हणून प्रस्थापित करण्याचा सिडकोला सार्थ अभिमान आहे. देशातील पहिला आयकॉनिक मल्टिपर्पज इनडोअर लाईव्ह एन्टरटेनमेन्ट अरेना उभारणीसाठी सुरू करण्यात आलेली प्रक्रिया ही आगामी सांस्कृतिक आणि आर्थिक क्रांतीचा पाया आहे. या प्रकल्पाद्वारे जागतिक दर्जाची करमणूक भारतीयांकरिता खुली होऊन कलाकार, उद्योजक आणि स्थानिक समूहांकरिता व्यापक प्रमाणावर संधी उपलब्ध होणार आहेत व नवी मुंबईचे जागतिक नकाशावरील स्थान अधिक बळकट होणार आहे. प्रत्येक टप्प्यावर कल्पनांना मूर्त रूप देण्यासाठी असलेली सिडकोची कटिबद्धता अधोरेखित होत आहे.
>
> **विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

# विधिमंडळ हिवाळी अधिवेशन-२०२५ 'दूरध्वनी पुस्तिके'चे माहिती विभागाचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांच्या हस्ते प्रकाशन

**नागपूर । वृत्तसंस्था**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे तयार करण्यात आलेल्या 'हिवाळी अधिवेशन २०२५ दूरध्वनी पुस्तिके'चे प्रकाशन माहिती विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. नागपूर येथे अधिवेशनाकरिता येणाऱ्या राजकीय प्रतिनिधी, अधिकारी, पत्रकार व नागरिकांना संबंधित शासकीय यंत्रणेशी सुलभ आणि त्वरित संपर्क साधता यावा, या उद्देशाने ही विस्तृत मार्गदर्शिका तयार करण्यात आली असून संबंधितांना ही उपयुक्त ठरेल, असा विश्वास प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केला.



यावेळी मान्यवरांच्या हस्ते या दूरध्वनी पुस्तिकेच्या क्यू आर कोड चेही प्रकाशन करण्यात आले. या क्यू आर कोडमुळे संपूर्ण दूरध्वनी पुस्तिका आता डिजिटल स्वरूपात सहजपणे ऑनलाईन उपलब्ध झाली आहे, ज्यामुळे पुस्तिका छापाईसाठी लागणाऱ्या शासनाच्या निधीतही मोठ्या प्रमाणात बचत झाली आहे.

अधिवेशनाच्या काळात सुलभ समन्वयासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारी ही दूरध्वनी पुस्तिका दोन भागांत विभागली आहे: भाग-१ (राजकीय व व्यवस्थेशी संबंधित): यात प्रामुख्याने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्रिमंडळाचे सदस्य, विधानमंडळाचे प्रमुख (अध्यक्ष, सभापती) यांची कार्यालये व निव-ासस्थाने यांचे संपर्क क्रमांक समाविष्ट आहेत. तसेच, विधान भवन, हैदराबाद हाऊस, रवी भवन आणि नाग भवन येथील तात्पुरत्या निवास व कार्यालयाच्या व्यवस्थापनाचे संपर्क क्रमांक देण्यात आले आहेत. यासह, महाराष्ट्रातील महत्त्वाच्या अधिकाऱ्यांचे संपर्क आणि नागपूर शहर परिसरातील वैद्यकीय सुविधा, पर्यटन स्थळे व परिवहन (रेल्वे, विमान वाहतूक) संबंधी माहितीही उपलब्ध आहे.

भाग-२ (शासकीय कार्यालये): यात नागपूरमधील विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस विभाग, न्याय व्यवस्था आणि विविध प्रशासकीय विभाग (सार्वजनिक बांधकाम, वित्त, जलसंपदा) व स्थानिक स्वराज्य संस्था (मनपा/एनआयटी) यांच्या कार्यालये व अधिकाऱ्यांचे विस्तृत संपर्क क्रमांक समाविष्ट आहेत. पुस्तिका प्रकाशन सोहळ्याला सामान्य प्रशासन विभागाचे प्रभारी उपसचिव अजय भोसले, कक्ष अधिकारी युवराज सोरेगावकर, माहिती विभागाचे संचालक (प्रशासन) किशोर गांगुर्डे, ना-गपूर- अमरावती विभागाचे संचालक डॉ.गणेश मुळे व संचालक (वृत्त व जनसंपर्क) गोविंद अहंकारी, महासंचालक यांचे विशेष कार्य अधिकारी इरशाद बागवान व जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार हे उपस्थित होते.

या दूरध्वनी पुस्तिका निर्मितीसाठी गडचिरोलीचे प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी गजानन जाधव, नागपूर माहिती विभागातील सहायक संचालक पल्लवी धारव, माहिती अधिकारी रितेश भुयार, माहिती अधिकारी अतुल पांडे तसेच माध्यम समन्वयक अनिल गडेकर आणि शासकीय मुद्रणालयाचे सहकार्य लाभले.

# कौटुंबिक न्यायालयात 'मध्यस्थी जन-जागृती' कार्यक्रम संपन्न: समोपचाराने वाद मिटवण्याचा संदेश

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

कौटुंबिक विवादांवर समोपचाराने आणि प्रभावीपणे तोडगा काढण्यासाठी कौटुंबिक न्यायालय, बेलापूर येथे दिनांक ०६ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता 'मध्यस्थी जन-जागृती' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सुभाष काफरे,न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, बेलापूर, नवी मुंबई यांनी भूषवले. तसेच व्यासपीठावर त्यांच्यासोबत नवी मुंबई कोर्ट बार संघटनेचे उपाध्यक्ष संदीप रामकर आणि सचिव विकास म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. शीतल गायकवाड यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेमध्ये प्रशिक्षित मध्यस्थ ॲड. मोहित मोकल यांनी मध्यस्थी प्रक्रियेचे महत्त्व आणि फायदे स्पष्ट केले.

याप्रसंगी न्यायाधीश सुभाष काफरे यांच्या संकल्पनेतून 'मध्यस्थी' या विषयावर लघु नाटिका सादर करण्यात आली. या लघु नाटिके मध्ये भूमिका सादर करणारे कलाकारांमध्ये ॲड. वंदना दळवी, ॲड. शोभा पाटील, ॲड. संध्या सावंत, ॲड. कृष्णा पवार, ॲड. प्रसाद मढवी, ॲड. विशाखा जाधव, ॲड. किरण भोसले, तसेच कौटुंबिक न्यायालयाचे वरिष्ठ लिपिक कांचन किरवे आणि सहायक राज निकम यांचा समावेश होता. या भूमिकेमधून नवरा-बायकोमधील भांडण आणि त्या भांडणांचा कुटुंबावर आणि मुलांवर होणारा नकारात्मक परिणाम स्पष्ट करण्यात आला. त्यानंतर हे दाम्पत्य न्यायालयात गेल्यावर मध्यस्थीच्या माध्यमातून त्यांचे वाद कसे मिटवले जातात, हे दाखवून शेवटी ते जोडपे एकत्र येऊन सुखी संसार होतो, हा सकारात्मक शेवट प्रभावीपणे दाखवण्यात आला. या महत्त्वपूर्ण भूमिकेत सहभागी झालेल्या सर्व कलाकारांना नवी मुंबई कोर्ट बार संघटना आणि कौटुंबिक न्यायालय, बेलापूर यांच्या वतीने प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आणि त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रबंधक गणेश हिरवे यांनी केले. या कार्यक्रमामुळे कौटुंबिक विवादांचे न्यायालयाबाहेर सामंजस्याने निराकरण करण्यासाठी 'मध्यस्थी' हा एक प्रभावी मार्ग कसा आहे, याबद्दल उपस्थितांमध्ये मोठी जनजागृती झाली.

सदर कार्यक्रमाच्या प्रसंगी, सुकून प्रकल्पाच्या समुपदेशक सोनल बंदबे, तालुका विधी से-वेचे कर्मचारी पटेल कौटुंबिक न्यायालयाचे कर्मचारी, विधीज्ञ वर्ग आणि पक्षकार उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कौटुंबिक न्यायालयाचे कर्मचारी आणि नवी मुंबई कोर्ट बार संघटनेचे पदाधिकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# विविध सुविधांच्या माध्यमातून पनवेल अद्यावत शहर होण्यासाठी प्रयत्न : परेश ठाकूर




**दै.रायगड नगरी । पनवेल**

शासन जर संवेदनशील असेल तर ते जनतेपर्यंत पोहचू शकते आणि जनतेची सेवा करू शकते. प्राण्यांच्या बाबतीतही संवेदनशील असलेल्या पनवेल महानगरपालिकेचे झिरो रेबीज निर्मुलन अभियान कौतुकास्पद आहे. पनवेल महापालिकेने या शिबिराच्या माध्यमातून पाळीव प्राण्यांना चांगल्या प्रकारे आरोग्य सुविधा उप-लब्ध करून दिल्या आहेत.तसेच महापालिकेने पाळीव श्वानांसाठी फिरते रूग्णालयही सुरू केले आहे.अशा विविध सुविधांच्या माध्यमातून पनवेल अद्यावत शहर होण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सांगितले.

पनवेल महानगरपालिका पशुवैद्यकीय विभागामार्फत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली झिरो रेबीज निर्मूलन कार्यक्रमांतर्गत शहरातील सर्व पाळीव प्राण्यांसाठी मोफत रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण व आरोग्य तपासणी शिबिर आज नवीन पनवेलमधील जागृती सभागृहात मिनीस्ट्री ऑफ पेट्स आणि महापालिका यांच्या संयुक्त विद्यमानातून आयोजित करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते.

यावेळी माजी महापौर डॉ.कविता चौतमोल, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.भगवान गीते, डॉ.मधुलिका लाड, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, वृषाली वाघमारे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.राजू पाटोदकर, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रीय पातळीवरील नॅशनल क्शन फॉर डॉग मेडिकेटेड रेबीज इलिमेशन २०३० (छ-झठए) अंतर्गत हा उपक्रम सुरू असून पनवेल महानगरपालिका शून्य रेबीज या उद्दिष्टाकडे वाटचाल करत आहे.

भारतामध्ये दरवर्षी रेबीजमुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांचे मृत्यू होत असून त्यापैकी बहुसंख्य प्रकरणे संक्रमित प्राण्यांच्या चाव्यामुळे होतात. रेबीज हा प्रतिबंधात्मक आजार असून प्राण्यांचे वेळेवर लसीकरण हा यावर सर्वात प्रभावी उपाय आहे. याच उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सुमारे २२५ पाळीव मांजरी व पाळीव श्वानांचे रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात आले.

उपायुक्त प्रसेनजित कारलेकर व मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने या वर्षी सुमारे १५ हजार ६८९ भटक्या श्वानांचे लसीकरण केले आहे. प्राणी जन्म नियंत्रण कार्यक्रमांतर्गत १हजार ९८० भटक्या श्वानांचे व ३४५ भटक्या मांजरीचे लसीकरण करण्यात आले आहे. याच बरोबर पाळीव प्राण्यांना आरोग्य सेवा देण्यासाठी मोफत फिरत्या पशुवैद्यकीय दवाखानाचा आजवर १ हजारांहून अधिक पशु प्रेमींनी लाभ घेतला आहे .या फिरत्या पशुवैद्यकीय दवाखानाच्या मार्फत ६०० हून अधिक श्वान व मांजरीचे लसीकरण करण्यात आले आहे.

## रेशन दुकानदारांचे कमिशन रखडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील १९९ दुकानदारांपैकी १२० दुकानदारांचे कमिशन रखडले आहे. याबाबत रास्त भाव धान्य दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेते असोसिएशनने पुरवठा विभागाच्या उपायुक्तांना पत्र लिहून कमिशन वितरित करण्याची मागणी केली आहे.

जून २०२५ पासून हे कमिशन दिलेले नाही. तालुक्यातील ५३ रास्त भाव धान्य दुकानदारांचे अद्ययावत प्रणालीद्वारे रजिस्ट्रेशन प्रलंबित असून, २६ दुकानदारांची माहिती प्राप्त नाही. याबाबत निर्णय घेण्याची विनंती अध्यक्ष भरत पाटील यांनी पत्राद्वारे केले आहे.

# काम रखडलेल्या वर्दळीच्या रस्त्यावर धुळीचे साम्राज्य नागरिक हैराण

**दै.रायगड नगरी । रवींद्र कुवेसकर**
**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव मधे धुळीच साम्राज्य झालं आहे.... कचेरी रोड, कालवा रोड, डॉक्टर वैद्य नेत्र हॉस्पीटल ते प्रशासकीय भवन कार्यालय, साई मंदिरा पर्यंत संपूर्ण रस्त्यावर धूळीचे साम्राज्य आहे. त्यामुळे या परिसरातील हवेत सतत धुलीकण श्वासातुन फुफ्फुसात जाऊन सर्दी, खोकला, दमा होण्याची दाट शक्यता व्यक्त करत तशी तक्रार येथील नागरिकांमधुन पत्रकारांजवळ केली जात आहे.



माणगांव शहरातील नवीन पाणीपुरवठा योजनेंतर्गत सध्या पाईप लाईनचे काम सुरू असल्याने तसेच अनेक ठिकाणी झालेल्या खोदकामामुळे परिसरातील धुळीचे प्रमाण वाढले आहे. विशेष म्हणजे तहसिलदार प्रशासकीय भवन कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्याला खड्डेच खड्डे असल्याने तेथील खड्डे बुजविण्याचे काम आणि रस्ता रुंदीकरणाचे काम सुरु केले गेले मात्र हे काम आठवडाभर सुरु असून तेथे डांबर कार्पेट अंथरण्याचे काम अर्धवट रखडल्याने येथील झालेल नुसतेच खडीकरण व क्रस्ट मिश्रीत धुलीकण येथील रस्त्यावर कोणतेही वाहन गेल्यानंतर हवेत उडुन पुढून मागुन चालणे मुश्किल होते.

तसेच हवेतील धुळ येथील नेत्र रुग्णालयात तसेच येथील घराघरात थराने जमा होऊन अस्वच्छतेत भर पडली आहे. तालुक्यातील व बाहेर गावाहून नेत्र चिकित्सेसाठी आलेले रुग्ण व येथील स्थानिक नागरिकांना श्वास गुदमरत असल्याचा अनुभव येत आहे.

संबंधित प्रशासन व नगरपंचायतकडुन याची दखल घेत हे काम लवकरात लवकर पुर्ण करावे अशी नागरिकांची मागणी होत आहे. तसेच राजकिय पक्ष बदलात आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांच्या प्रचाराच्या धुरळ्यात व्यस्थ पुढाऱ्यांच्या नजर-ेवर माणगांवमधील रस्त्यावरील धुरळा दिसत नाही का? असा संतप्त सुर देखील नागरिकांकडून एकायला येत आहे.

शेवटी मतांच्या धुरळ्यात रस्त्याचा धुरळा दिसेनासा! झाला असुन लोकांचे प्रश्न धुरळ्यात, नेत्यांचे वायदे ढगात असल्याचेच चित्र आहे.

# महिला सक्षमीकरणाकडे पनवेल महापालिकेचे आश्वासक पाऊल ; २० हजार महिलांना दोन दिवसीय जागृती प्रशिक्षण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिका क्षेत्रातील महिलांना स्वावलंबी व सशक्त बनवण्यासाठी , व्यवसायिक व सामाजिक कौशल्य वाढविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महिलांना विविध लघुउद्योग आणि कौशल्यविकास विषयक प्रशिक्षणाबाबत मोफत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली चारही प्रभागातील सुमारे २० हजार महिलांना दोन दिवसीय जागृती प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

महिलांना स्वावलंबी, सबळ बनविणे तसेच त्यांचा व्यावसायिक आणि सामाजिक सक्षमीकरण साधण्यासाठी पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने दोन दिवसीय प्रशिक्षण आणि जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा उद्देश महिलांना आरोग्य, रोजगार, व्यवसाय, कायदे, तंत्रज्ञान आणि सामाजिक हक्कांविषयी माहिती देऊन त्यांना आत्मनिर्भर बनवणे हा आहे. या उपक्रमांतर्गत विविध विषयांवर आधारित मार्गदर्शन करण्यात येणार आहे. महिलांच्या सुदृढ आरोग्यासाठी मासिक पाळी स्वच्छता, मानसिक आरोग्य, कॅन्सरविषयक जनजागृती तसेच आधुनिक आरोग्य साधनांचा वापर याविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे. योगाचा शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणारा सकारात्मक परिणाम, ध्यानाचे फायदे तसेच प्राणायामाचे व्यावहारिक प्रात्यक्षिक महिलांना दिले जाणार आहे.

नवी मुंबई विमानतळ, एमआयडीसी, जेएनपीटी, पर्यटन, हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील रोजगार संधी, ऑनलाइन व्यवसाय, डिजिटल बँकिंग, गुंतवणूक पर्याय, तसेच घरातून सुरू करता येणारे व्यवसाय या विषयांवर प्रशिक्षणाबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. स्व-ओळख, संवाद कौशल्य, निर्णय क्षमता, वेळ व्यवस्थापन, आत्मविश्वास वाढविणे, इव्हेंट मॅनेजमेंट, योग्यता विकास अशा विषयांचा समावेश यात करण्यात आला आहे. कार्बन फुटप्रिंट कमी करणे, ओल्या-सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण, घरगुती कंपोस्ट तयार करणे आणि पुनर्वापराचे महत्त्व याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात येणार आहे. महिलांसाठीचे कायदे, हुंडाबंदी, स्त्री-भ्रूणहत्या प्रतिबंध, 'पनवेल कनेक्ट ॲटप'चा वापर, शासकीय योजना आणि वेबसाइटवरून अर्ज प्रक्रिया अशा विषयांबाबत माहिती दिली जाणार आहे.

